28 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'संत गजानन'मध्ये मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्घाटन

# युवा महोत्सवाला उत्साहात प्रारंभ, कलागुणांची देवाण-घेवाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज** : ऐतिहासिक किल्ले सामानगडच्या पायथ्याशी असणाऱ्या चिंचेवाडी येथील संत गजानन महाराज शिक्षण समूहाच्या प्रशस्त प्रांगणात शिवाजी विद्यापीठाच्या ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाला अमाप उत्साहात प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठ आणि संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

पहिल्याच दिवशी मराठी व हिंदी वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारने रद्द केलेले ''कृषी कायदे'' या विषयावर अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केली, तसेच भारतीय समूहगीत, मूकनाट्य, नकला, लोककला, लघुनाटिका, सुगम गायन, शास्त्रीय गायन, एकपात्री अभिनय, पथनाट्य, व्यंगचित्र, कातरकाम, मेहंदी, रांगोळी व प्रश्नमंजुषा आदी कला प्रकारांच्या माध्यमातून आपल्या कलेचा सुंदर आविष्कार घडविला.

कोरोना महामारीमुळे दोन वर्षांत मुलांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध नव्हते. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांनी या मोठ्या उत्साहाने भाग घेतला आहे. त्यात मुलींची संख्या अधिक आहे. गेल्यावर्षी मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन युवा महोत्सव घेतला होता; परंतु यंदा कोरोना काळात देखील युवा महोत्सव भरवणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे. पहिल्या दिवशी भारतीय समूहगीत, मूकनाट्य, नकला, लोककला, लघुनाटिका, सुगम गायन, शास्त्रीय गायन, एकपात्री अभिनय, आदी १६ प्रकारात कला सादर केली.






चिंचेवाडी येथे शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सोमवारी उद्घाटन झाले. यावेळी जिल्हा युवा महोत्सवातून निवड झालेल्या संघांनी आपली कला सादर करत उपस्थित विद्यार्थी, प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

## आजचे कार्यक्रम :

पाश्चिमात्य समूहनृत्य, लोकसंगीत वाद्यवृंद, शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य, शास्त्रीय सूरवाद्य, शास्त्रीय तालवाद्य, पाश्चिमात्य एकल वाद्यवादन, पाश्चिमात्य एकल गायन, एकांकिका, स्थळ छायाचित्रण, स्थळचित्र हे कार्यक्रम होणार आहे.

## मिणचेकरांना 'वन्समोअर'..!

उद्घाटक म्हणून आलेल्या माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर यांना आपले गाणे पेश करण्याची विनंती करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या 'तेरे रस्के कमर' या गाण्याला विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात वन्समोअरने दाद दिली.

लोकसत्ता

# श्रीकृष्ण महाजन यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर :** स्त्रियांचा आदर करीत असताना शिवाजी महाराजांनी मानवतेची व लोकशाहीची बीजे रोवली. प्रा. महाजन यांच्या पुस्तकाने शिवरायांच्या उदात्त दृष्टिकोनावर प्रकाश टाकला आहे, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासिका डॉ. मंजुश्री पवार यांनी केले. 'छत्रपती शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन' या प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन लिखित पुस्तकाचे प्रकाशन केल्यानंतर त्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास विभाग व नाग नालंदा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते. इतिहास अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील म्हणाले मध्ययुगीन काळात स्त्रियांबाबतीत शिवाजी महाराजांच्या इतका उदात्त दृष्टिकोन दुसऱ्या कोणाचाही नव्हता. त्यांनी लढाईत धारातीर्थी पडलेल्या मावळ्यांच्या विधवांना निवृत्तिवेतन सुरू केले होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. अवनीश पाटील यांनी केले. प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी आभार मानले.

2 8 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थीदशेतच कला जोपासणे आवश्यक

## सुजित मिणचेकर : शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा मध्यवर्ती युवा महोत्सव उत्साहात

**महागाव : वार्ताहर**

विद्यार्थीदशेतच अभ्यासाबरोबर कोणतीही कला जोपासणे आनंदी जीवनासाठी अत्यावश्यक असते. आपल्यातील कौशल्य व मिळणारा वाव यांची योग्य ती सांगड घालून वाटचाल केल्यास यश निश्चित मिळते. विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेले युवा महोत्सवाचे व्यासपीठ विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर यांनी केले.



महागाव : युवा महोत्सव उद्घाटनप्रसंगी बोलताना सुजित मिणचेकर.

महागाव (ता. गडहिंग्लज) येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सव उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. डॉ. आण्णासाहेब चव्हाण होते. महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. यशवंत चव्हाण, गटविकास अधिकारी शरद मगर यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी समूहगीत, मूकनाट्य, नकला, लोककला, गायन, पथनाट्य, वाद-विवाद, मेहंदी, रांगोळी, प्रश्नमंजूषा, लघुनाटिका, एकपात्री अभियान, वादविवाद यांचे सादरीकरण केले. सादरीकरणाला विद्यार्थ्यांनी भरभरून दाद दिली.

यावेळी गोकुळचे संचालक शशिकांत पाटील-चुयेकर, सचिव ॲड. बाळासाहेब चव्हाण, प्रा. व्ही. एन. पाटील, डॉ. डी. जी. चिघळीकर, प्रा. टी. के. करीकट्टी, डॉ. व्ही. वाय. कदम, डॉ. एस.जी. किल्लेदार, डॉ. मंगल मोरबाळे यांच्यासह विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी, शिक्षकांची उपस्थिती होती.

2 8 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवनवीन संशोधन, प्रयोगांना महत्त्व येणार : डॉ. पी. एस. पाटील

**नेसरी, ता. २७ :** पुस्तकी ज्ञानाबरोबरच नवनवीन संशोधन, प्रयोगांना येथून पुढे महत्त्व येणार असून, केवळ कौशल्याधारित शिक्षण महत्त्वाचे असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी सांगितले. येथील शिक्षण समिती कसबा नेसरी संचलित तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयास सदिच्छा भेटीप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्था संचालिका डॉ. अर्चना कोलेकर यांच्या हस्ते डॉ. पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत झाले. डॉ. पाटील म्हणाले, की शिवाजी विद्यापीठ हे देशातील नामवंत विद्यापीठ असून, विद्यापीठाचे विद्यार्थी स्वतःच्या कौशल्यावर अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स आदी देशाबरोबर जगभरातल्या कानाकोपऱ्यात पोहचले आहेत. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. भांबर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. कोलेकर, डॉ. विजय मुसाई यांनी मनोगत व्यक्त केले. संस्था सचिव विजय नाईक उपस्थित होते. डॉ. भूपाल दिवेकर यांनी आभार मानले.



**नेसरी : विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना डॉ. अर्चना कोलेकर. शेजारी डॉ. एस. बी. भांबर, विजय नाईक.**